# :: प्रेस नोट ::

## कस्तुरबा मार्ग पोलिस ठाण्याकडुन वयोवृद्ध महीलेचे सोन्याचे मंगळसुत्र जबरीने खेचुन चोरी करून पळालेल्या आरोपीस अवघ्या दोन तासात ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणुन संपुर्ण मालमत्ता हस्तगत केलेबाबत

फिर्यादी **श्रीमती बबाबाई शांताराम कदम वय ७० वर्षे** धंदा- घरकाम पत्ता- झुंजार चाळ क्रांतीनगर आकुर्डी रोड लोखंडवाला कांदिवली पूर्व मुंबई या दिनांक २९/०९/२०२६ रोजी १४:३० वा. दरम्यान राजमाता जिजाऊ चौक वेस्टन एक्सप्रेस हायवे साउथ बॉन्ड वरून घराकडे जात असताना तेथील बस स्टॉप जवळ एका अंदाजे २५ वर्ष वयाच्या अनोळखी महिलेने फिर्यादी यांच्या गळ्यातील एक तोळा वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र संमतीशिवाय जबरीने खेचून चोरून नेले म्हणून अनोळखी महिलेविरुद्ध कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ६६७/२०२६, कलम ३०९(४) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच गुन्हेप्रकटीकरण पथकाचे सपोनि राहुल पाटील, तपासी अधिकारी पोउनि जनार्दन शिंदे व पथक यांनी घटनास्थळ पाहणी करून व पारंपारीक पद्धतीने कौश्यल्यपूर्ण तपास केला. घटनास्थळ हे वेस्टर्न एक्सप्रेस हायवेच्या ब्रीजच्या बाजूला असल्याने तेथे कोणताही सरकारी किंवा खाजगी कॅमेरा उपलब्ध नसताना देखील तपास पथकाने केवळ फिर्यादीने सांगितलेल्या वर्णनाच्या आधारे मागाठाणे, फुलपाखरू गार्डन, देवीपाडा, साईधाम मंदिर, अशा परिसरामध्ये आरोपीचा कसून शोध घेतला. तपासादरम्यान देवीपाडा येथील आरियाणा बिल्डिंगच्या परिसरातुन एका महीलेस ताब्यात घेतले. नमुद महीलेकडुन चोरीस गेलेली संपुर्ण मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. फिर्यादी यांचे चोरीस गेलेले मंगळसुत्र दिनांक ०३/१०/२०२६ रोजी मा. श्री. गजानन राजमाने सो, पोलीस उप-आयुक्त उत्तर परिमंडळ-३, मुंबई यांच्या हस्ते त्यांना परत करण्यात आले आहे.

**यातील फिर्यादी या ७० वर्षे वयाच्या जेष्ठ नागरीक असुन घरकाम करून उदरनिर्वाह करतात. त्या सदर घटनेमुळे भयभीत झालेल्या होत्या. त्यांना तपास पथकाने आधार देवुन त्वरीत कार्यवाही करून त्यांचे मंगळसुत्र व चोरी करणारी महीला यांना ताब्यात घेतल्याने त्यांनी समाधान व्यक्त करून मुंबई पोलीस दलाचे कौतुक करून आभार व्यक्त केले.**

सदरची कारवाई मा. श्री. शशीकुमार मीना सो, अप्पर पोलीस आयुक्त, मा. श्री. गजानन राजमाने सो, पोलीस उप-आयुक्त उत्तर परिमंडळ-३, मा. श्री. जयराज रणवरे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त, दहिसर विभाग यांच्या मार्गदशनाखाली वपोनि श्री. बाळासाहेब बनकर, पोनि श्री. योगेश पवार, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि राहुल पाटील, तपासी अधिकारी पोउनि जनार्दन शिंदे, पोह मुजावर, पोशि सवळी, पोशि पुजारी, पोशि फोपसे, पोशि सकपाळ, पोशि कुटे यांनी केलेली आहे.